# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम- १३२/२०२०**

**तक्रारकर्ता - श्री. संतोषकुमार रामप्रसाद पांडे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,उपजिल्हाधिकारी कक्ष, प्रशासकीय इमारत,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,उपजिल्हाधिकारी कक्ष, प्रशासकीय इमारत,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १०.१०.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि. ०३.०७.२०१९ रोजी माहिती अर्ज सादर करुन माहिती विचारली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.११.२०१९ रोजी आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना आवश्यक असलेल्या माहितीबाबत या कार्यालयातील उपलबध संचिकेचे उपलबध असलेली माहिती देण्यात यावी असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न झाल्याने तक्रारकर्ता यांनी दि. ०६.०२.२०२० रोजी आयोगाकडै थेट तक्रार दाखल केली.

उक्त तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ यांच्याकडून दि.२४.०२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ यांनी त्यांचा दि. ०५.०३.२०२० रोजीचा अहवाल आयोगास सादर केला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी दि. ०५.०३.२०२० रोजी अहवाल सादर करण्यात आला आहे. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती दि. २४.०२.२०२० रोजी पुरविण्यात आलेली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झाल्याची नोंद असलेले पत्र आयोगास सादर केले.

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची प्रत

..२/-

उपलब्ध करुन दिली. परंतु माहिती अर्जात नमूद केलेली माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, की, त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखात दि.२४.११.२०१७ रोजी माहिम पोलीस ठाणे यांना पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत संबंधित नस्ती / अभिलेखात उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत आणखी वेळेची मागणी केली.

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.११.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

13-10-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १३.१०.२०२५**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १३२/२०२०**
**तक्रारकर्ता श्री. संतोषकुमार रामप्रसाद पांडे**
**सुनावणी दिनांक : २७.११.२०२५ (In continuation of order dt १३.१०.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखात दि. २४.११.२०१७ रोजी माहिम पोलीस ठाणे यांना पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत संबंधित नस्ती / अभिलेखात उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत आणखी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. त्यांनी दि. २४.११.२०१७ रोजी माहिम पोलीस ठाणे यांना पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत शोधण्यासाठी आणखी वेळेची मागणी करण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०८.१२.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

सत्यमेव जयते

27-11-2025

**मुंबई**
**दिनांक : २७.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ